# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

सत्यमेव जयते

## सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व अध्यक्ष आणि सदस्य जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग पदांच्या भरतीच्या ऑनलाईन परीक्षेसाठी माहिती पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑन-लाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवाराने या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाचे बहुपर्यायी प्रश्न असतील.

**<u>परीक्षेच्या प्रश्नावलीचे स्वरूप</u>**

| | **अनु. क.** | **प्रश्नावलीचे नाव** | **प्रश्न संख्या** | **अधिकतम गुण** | **माध्यम** | **अवधि** |
|---|---|---|---|---|---|---|
| पेपर I<br>वस्तुनिष्ठ प्रकार | 1 | सामान्य ज्ञान आणि चालू घडामोडी | 40 | 40 | द्विभाषी अर्थात इंग्रजी आणि मराठी | 120 मिनिटे |
| | 2 | भारतीय संविधानाचे ज्ञान | 20 | 20 | | |
| | 3 | ग्राहक संरक्षण संबंधी विविध कायद्याचे ज्ञान | 40 | 40 | | |
| | | Total | 100 | 100 | | |
| पेपर II<br>वर्णनात्मक प्रकार | 1 | व्यापार आणि वाणिज्य, ग्राहक समस्या संबंधी तसेच जनसंपर्क संबंधित विषयावर निबंध | 2 | 50 | इंग्रजी आणि मराठी (प्रत्येक प्रश्नाला लागू असणारे) | 180 मिनिटे |
| | 2 | ठोस मसूदा किंवा ऑर्डर चे विश्लेषण करण्याची क्षमता तपासण्यासाठी ग्राहक खटल्यावर केस स्टडी | 2 | 50 | | |
| | | | | 100 | | |
| | | **एकूण** | | **200** | | |

वस्तुनिष्ठ परीक्षा ऑनलाइन होईल. वर्णनात्मक परीक्षा ऑनलाइन/ऑफलाइन होईल (प्रश्न संगणकाच्या पडद्यावर दर्शविले जातील आणि उत्तरे विभागाने दिलेल्या उत्तरपत्रिकेवर लिहावी लागतील.)

**सूचनाः** पेपर I ची परीक्षा सकाळ सत्रात, तर पेपर II ची परीक्षा दूपार सत्रात घेतली जाईल.

परीक्षेसाठी (पेपर I आणि पेपर II साठी) अनुक्रमे 120 आणि 180 मिनिटांचा अवधि आहे, तरीही उमेदवारास परीक्षास्थानी अनुक्रमे 180 आणि 220 मिनिटे थांबावे लागेल, ज्यामध्ये नोंद करणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ. साठी लागणा-या कालावधीचासुद्धा समावेश आहे. आपण वस्तुनिष्ठ प्रश्नावलीतील प्रश्न त्या प्रश्नावलीसाठी दिलेल्या वेळात (120 मिनिटे) सोडवू शकता. आपण वर्णनात्मक प्रश्नावलीतील प्रश्न त्या प्रश्नावलींसाठी दिलेल्या वेळात (180 मिनिटे) सोडवू शकता. वस्तुनिष्ठ प्रश्नावलीतील प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून समजले जाईल. वर्णनात्मक प्रश्नावली ऑनलाइन/ऑफलाइन असेल. कम्प्यूटर वर प्रश्न दर्शविले जातील. विभागाकडुन दिलेल्या उत्तर पत्रिकेवर उत्तरे लिहावीत. उमेदवाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी नकारात्मक गुणांकन केले जाईल. प्रत्येक चुकीच्या उत्तरास, त्या प्रश्नास असलेल्या अंकापैकी 1/4 गुण कापण्यात येईल.**

**कृपया नोंद घ्यावी की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे केवळ उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे, अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद नसलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

नमुन्यादाखल काही प्रश्न खाली दिले आहेत.

## नमुना प्रश्न

## सामान्य ज्ञान आणि वर्तमान घडामोडी

**प्र.1.** कोणत्या देशाने क्रिकेट - विश्वचषक 2007 जिंकला ?
(1) दक्षिण आफ्रिका (2) श्रीलंका (3) इंग्लंड (4) न्यूझिलंड (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.2.** महाराष्ट्रात खालील पैकी कोणते पीक घेतले जात नाही ?
(1) ज्वारी (2) गहू (3) ज्यूट (4) कापूस (5) तंबाखू

**प्र.3.** महाराष्ट्रात खालीलपैकी कोणत्या शहरात कुंभमेळा भरतो ?
(1) पुणे (2) रत्नागिरी (3) नाशिक (4) पंढरपूर (5) कोल्हापूर

**प्र.4.** अवैध पैशाविरूद्धच्या लढाईमध्ये खालीलपैकी कोणत्या वित्तीय संस्थेने '**आपल्या ग्राहकांना जाणा'** (Know Your Customer) योजनेची सुरूवात केली ?
(1) आई डी बी आई (2) आर बी आय (3) नाबार्ड (4) सीडबी (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.5.** खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमारेषा महाराष्ट्राच्या सीमारेषेशी लागून नाही ?
(1) छत्तीसगढ़ (2) कर्नाटक (3) आन्ध्र प्रदेश (4) राजस्थान (5) गुजरात

## भारतीय संविधानाचे ज्ञान

**प्र.1.** भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद 39(d) नुसार, राज्य हे, विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीने आपले धोरण आखील, त्यात __________ असेल.
(1) समान कामासाठी समान वेतन
(2) पुरुष आणि स्त्रियांना समान संधी
(3) सार्वजनिक रोजगाराच्या बाबींत समान संधी
(4) समान कामासाठी पुरुष आणि स्त्रिया दोघांना समान वेतन
(5) कायद्यांचे समान संरक्षण

## ग्राहक संरक्षण संबंधी विविध कायद्याचे ज्ञान

**Q.1.** मालाच्या खरेदीदारास, अशा खरेदीची अट म्हणून, अन्य माल खरेदी करणे आवश्यक असलेल्या करारास _________ म्हणतात.
(1) प्रतिषेधात्मक विक्री (2) संगनमताचा व्यापार (3) निर्बंधक व्यापार
(4) अनुचित व्यापार (5) टाय-इन करार

## व्यापार आणि वाणिज्य, ग्राहक समस्या संबंधी तसेच जनसंपर्क संबंधित विषयावर निबंध

"जलद गतीने खपणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तू आणि आणि त्यांचे नियमन करणारे भारतातील कायदे" यावर एक निबंध लिहा.

## ठोस मसूदा किंवा ऑर्डर चे विश्लेषण करण्याची क्षमता तपासण्यासाठी ग्राहक खटल्यावर केस स्टडी

**नमुना केस अभ्यास**

मीराला तिच्या पतीने, प्रसादने घेतलेल्या आरोग्य विमा पॉलिसीच्या अंतर्गत फॅमिली फ्लोटरद्वारे संरक्षण आहे. मीरावर तातडीने हर्नियाची शस्त्रक्रिया करावी लागली, आणि हॉस्पिटलला रुपये 4,64,500/- च्या बिलाचा भरणा करावा लागला. हॉस्पिटलचे बिल रुपये 4,64,500/- च्या परतफेडीसाठी विमा कंपनीकडे केलेल्या दाव्याच्या बाबतीत कंपनीने फक्त रुपये 2,35,444/- मंजूर केले. दाव्याच्या तारखेपासून 30 दिवसांनी दाव्याची पूर्तता केली गेली.

जिल्हा आयोगाकडे ग्राहक संरक्षण कायद्याच्या अंतर्गत तक्रार दाखल केली गेली. या तक्रारीत सेवेमध्ये त्रुटीचा आरोप केला गेला आणि रुपये 63,000/- च्या परताफेडीसोबत नुकसान भरपाई म्हणून रुपये 10,000/- आणि खर्चापोटी रुपये 2000/- देण्याची मागणी केली गेली. कंपनीने दावा निश्चिती करताना इतर बाबींबरोबरच खालील बाबींचा दावा स्वीकारण्यास नकार दिला होता :

a. रक्ताची तपासणी, ईसीजी, एक्स रे शुल्क, एमआरआय या तपासण्यांचा खर्च रुपये 60,500/- दिला नव्हता व त्यासाठी दावा अर्जाबरोबर मूळ लॅबोरेटरी रिपोर्ट न जोडल्याचे कारण दिले होते.

b. इंजेक्शन सेवा शुल्क, शिरेतून कॅन्युलेशन शुल्क आणि कार्डियाक मॉनीटर शुल्क रुपये 2500/- या कारणाने नाकारले गेले होते की हे शुल्क पॉलिसीच्या नियमांनुसार देय नाही.

तक्रारदाराने हे मान्य केले की खाण्याचे शुल्क इत्यादी सारखे हॉस्पिटलच्या बिलात दिलेले शुल्क पॉलिसीच्या अटींनुसार देय नाही. त्यामुळे फक्त दोन बाबींच्या खर्चाची पूर्तता न केल्याविषयी तक्रार केली.

कंपनीने बाजू मांडली की कापलेले खर्च हे तक्रारदाराने सादर केलेल्या पॉलिसी दस्ताच्या नियमांच्या अनुसार आहेत आणि सांगितले की पॉलिसीतील खालील अटीनुसार हा निर्णय योग्यच होता.

"दाव्यासोबत खालील मूळ दस्त जोडले गेले पाहिजेत आणि निर्धारित कालावधीत सादर केले गेले पाहिजेत.

सर्व मूळ निदानमूलक रिपोर्टस (इमेजिंग आणि लॅबोरेटरी)च्या मूळ प्रती व त्यासोबत मेडिकल प्रॅक्टिशनरचे प्रिस्क्रिप्शन तसेच डायग्नोस्टिक सेंटरची बिले / इनव्हॉइस आणि पावत्या"

दाव्यावर पूर्तता करताना कंपनीने नाकारलेल्या तपासणी शुल्क आणि हॉस्पिटल सेवा शुल्काबद्दल तक्रारदाराने कंपनीच्या कृतीस आह्वान दिले.

हॉस्पिटल सेवा शुल्काबद्दल तक्रारदाराने पॉलिसीतील काही अटींवर प्रकाश टाकला, ज्या त्याच्या बाजूने होत्या :

"कंपनीने पॉलिसीत म्हटले होते की खालील बाबींचे खर्च देणे त्याना मान्य आहे - शुश्रुषा शुल्क, सेवा शुल्क, प्रशासनिक शुल्क, ----------, लॅबोरेटरी / डायग्नोस्टिक तपासण्या, एक्स रे सिटी स्कॅन, एमआरआय, यासारखे कोणतेही स्कॅन आणि डॉक्टरांच्या दृष्टीने आवश्यक किंवा हॉस्पिटमध्ये उपचारांच्या दरम्यान उपचार करणाऱ्या डोक्तारांच्या सल्ल्यानुसार तत्सम खर्च"

तक्रारदाराने भारतीय विमा विनियमन प्राधिकरण (आरोग्य विमा) विनियम, 2016 च्या विनियम 27 कडे आयोगाचे लक्ष वेधले :

"27. विमा कंपनीकडून दाव्याची पूर्तता / अस्वीकार:

i. विमा कंपनी दाव्याची पूर्तता किंवा अस्वीकार याविषयीचा निर्णय, जसे लागू असेल तसे, शेवटचे 'आवश्यक' दस्तऐवज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत करेल.

ii. ज्या ठिकाणी फसवणुकीची शंका असेल, अशी केस वगळता, पॉलिसीच्या नियम व अटींमध्ये 'आवश्यक' समजल्या गेलेल्या दस्तऐवजांची यादी दिलेली नाही."

**प्रश्न**

केसचे विश्लेषण करा आणि आयोगाच्या आदेशाचा मसुदा बनवा.

**(अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :**

(1) उमेदवारांसमोर एक लॉगइन पटल असेल. उमेदवारांना त्यांच्या प्रवेशपत्रावर दिलेला लॉगइन आईडी आणि पासवर्ड नमूद करून लॉगइन करावे लागेल. दोन्ही सत्रांसाठी दोन वेगवेगळे प्रवेशपत्र असतील.

(2) वस्तुनिष्ठ परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल. वर्णनात्मक परीक्षा ऑनलाइन/ ऑफलाइन होईल.

(3) वस्तुनिष्ठ प्रश्नावली मराठी आणि इंग्रजी भाषेत असेल. वर्णनात्मक परीक्षेचे माध्यम इंग्रजी/मराठी (प्रत्येक प्रश्नाला लागू असणारे) असेल.

(4) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच, उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला अचूक उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून समजले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(5) सर्व्हर मध्ये घड्याळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणक पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घड्याळात दर्शविलेली वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतःहून परीक्षा संपवण्याची किंवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(6) स्क्रीनच्या उजव्या बाजूला Question पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



**तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले नाही, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.**

'पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल.

(7) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. कृपया लक्षात राहू द्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करुन पडताळणीसाठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(8) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(10) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(11) निवडलेले उत्तर रद्द करण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किंवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(12) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. "जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये ग्राहय धरले जाईल."

(13) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम तो प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(14) उत्तर दर्शवल्यानंतर सुरक्षित केलेले प्रश्न किंवा पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(15) त्या-त्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग हे पटलाच्या (screen) वरच्या पट्टिकेवर (bar) दर्शविले जातील. एखाद्या विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला जाईल.

(16) एखाद्या विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप त्याच विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(17) एखाद्या विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(18) तुमच्या सोयीनुसार तुम्ही परीक्षेच्या कालावधीत केव्हाही त्या-त्या प्रश्नपत्रिकेतील विभाग आणि त्यातील प्रश्नांकडे जाऊ-येऊ शकता.

(19) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार समजला जाईल आणि असा परीक्षार्थी आयोगाने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(20) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे निरसन केले जाणार नाही.

(21) वस्तुनिष्ठ परीक्षेची 120 मिनिटे आणि वर्णनात्मक परीक्षेची 180 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने अंतिम 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

**(22) वस्तुनिष्ठ परीक्षेसाठी कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेची वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सादर' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थ्याने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करू नये, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल**

**(23) वर्णनात्मक परीक्षेसाठी कृपया लक्षात घ्या:**

**(1) प्रश्न, प्रश्नपटलावर (Monitor screen वर) दर्शविले जातील. उमेदवारास त्या प्रश्नांची उत्तरे आयोगाने दिलेल्या उत्तरपत्रिकेत लिहावयाची आहेत.**

**(2) प्रश्नपटलावर एकावेळी एकच प्रश्न दर्शविला जाईल.**

**(ब) सर्वसामान्य सूचना**

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची दखल घ्यावी.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या केंद्रावर पोहोचण्याची खातरजमा करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षा केंद्र पाहून यावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे (प्रवेश पत्रावर छापलेल्या) वेळेवर पोहोचू शकाल. उशीरा येणा-यांना प्रवेश दिला जाणार नाही.

(3) तुमचा नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा स्थानी आणावयाचे आहे. (प्रवेशपत्रावर शक्यतो तोच फोटो असावा जो तुम्ही अपलोड केला आहे)

(4) परीक्षा केंद्रावर तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि विभागाचे प्रतिनिधी यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. सूचनांचे उल्लंघन केले गेल्यास तुम्हाला अपात्र समजले जाईल आणि परीक्षा केंद्र सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय), स्मार्ट वॉच किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र (उपकरण) यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही.

(6) परीक्षेच्या दोन्ही सत्रांचे प्रवेशपत्रे (सकाळ आणि दुपार) उमेदवारास आपल्या सोबत आणावयाची आहेत. प्रवेशपत्रांवर नवीनतम फोटो चिकटवलेले असावे (शक्यतो तेच फोटो जे तुम्ही अपलोड केले आहेत).

(7) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र आणि सध्या वैध, मूळ स्वरुपातील फोटो ओळख पत्र (जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/फोटोसहित मतदान पत्र/गॅझेटेड अधिका-याच्या किंवा लोकप्रतिनिधिच्या सहीचे अस्सल लेटरहेडवरील फोटो ओळख पत्र/मान्यता प्राप्त महाविद्यालयाने/विश्वविद्यालयाने दिलेले ओळख पत्र (चालू वर्षासाठी स्विकारण्यायोग्य)/फोटोसहित आधारकार्ड/कर्मचारी ओळख पत्र) आणावे. उमेदवारांना प्रत्येक सत्रात प्रवेशपत्रासोबत फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत स्टेपल करून पर्यवेक्षकाकडे जमा करावी लागतील. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो-ओळख पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात काहीही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/शपथपत्र सादर केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(8) बायोमेट्रिक डाटा (अंगठ्याचा ठसा) आणि फोटो परीक्षेच्या ठिकाणी परीक्षेच्या सुरवातीस घेतला जाईल. बायोमेट्रिक डाटा च्या सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) आयोगाचा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल. **बायोमेट्रिक डाटा परीक्षा दरम्यान कधीही घेण्यास/सत्यता पडताळणीस विरोध केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल.** या संदर्भात खालील मुद्दे लक्षात घ्या:

(क) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.

(ख) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटं सुकली आहेत याची खात्री करून घ्या.

(ग) दोन्ही हातांची बोट सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोट ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.

(घ) ठसा घेतल्या जाणा-या अंगठ्याला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.

(या मुद्यांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

(9) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे उत्तरांच्या सारखेपणासाठी इतर परीक्षार्थ्यांच्या उत्तरांबरोबर विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थ्यास न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या/तिच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. विभाग अशा परीक्षार्थी विरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(10) तुम्ही स्वतः सोबत एक बॉल पॉईंट पेन आणावे. तुम्ही स्वतःसोबत एक स्टँप इंक पॅड आणु शकता. कच्चे काम करण्यासाठी कागद पुरविले जातील; ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर निवडण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. प्रत्येक परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेश पत्रासह पर्यवेक्षकाकडे जमा करावे लागतील.

(11) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी वितरणावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुस-या जागेवर हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणा-या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करु शकणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(12) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रांसमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षा केंद्रामध्ये दिला जाणारा कागद घेऊन जाणारे किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर वापर करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(13) भरतीच्या प्रक्रियेतील कोणत्याही वेळी, परिक्षार्थी द्वारा खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमध्ये अपात्र घोषित केले जाईल आणि भविष्यात आयोगाच्या कोणत्याही भरती प्रक्रियेमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमध्ये निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास त्याला प्रक्रियेच्या पहिल्या भागापासूनच अपात्र ठरविण्यात येईल.

(14) कृपया सामाजिक अंतर संबंधी पुढील पेज वर दिलेल्या सूचना वाचा.

**कृपया लक्षात ठेवाः**

उमेदवारांना स्वतःसोबत खालील गोष्टी आणण्याची सूचना दिली जाते :

- नवीनतम फोटो चिकटवलेली प्रवेशपत्रे, मूळ स्वरूपातील फोटो आेळखपत्र व त्याच्या दोन छायांकित प्रति
- प्रत्येक पदासाठी वेगवेगळी प्रवेशपत्रे
- एक बॉल पॉईंट पेन व एक इंक स्टँप पॅड

# सामाजिक अंतर संबंधी सूचना

.1 उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश पत्रात दिलेल्या वेळेनुसार उपस्थित रहायचे आहे. उशीरा येणा-या उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

.2 उमेदवारांचे परीक्षा अनुक्रमांक व लॅब क्रमांक परीक्षा केंद्राच्या बाहेर दर्शविले जाणार नाही, प्रत्येक उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश करते वेळी यासंबंधी माहिती दिली जाईल.

.3 परीक्षा केंद्रावर उमेदवारास आवश्यक लागणारे सामान

**परीक्षा केंद्रावर उमेदवारास केवळ ठराविक सामान आणण्याची परवानगी असेल:**

**अ. मास्क**

**ब. स्वतःचे हँड सॅनिटाइज़र (50 मिली.)**

**क. एक सामान्य पेन आणि स्टँप इंक पॅड (नीळे अथवा काळे)**

**ड. परीक्षा संबंधी कागदपत्रे (प्रवेश पत्र तसेच ID कार्डची प्रत जोडलेले प्रवेश पत्र, सत्यता तपासण्यासाठी मूळ ID कार्ड)**

**इ. लेखनीक (स्क्राइब) वापरणा-या उमेदवारांसाठी - व्यवस्थितरीत्या लिहिलेला व हस्ताक्षर केलेला स्क्राइब फॉर्म**

**परीक्षा केंद्राच्या आत अन्य कोणतेही सामान नेण्याची परवानगी नसेल.**

.4 उमेदवाराने आपले कुठलेही साधन/सामग्री इतरांना वापरण्यास देऊ नये.

.5 उमेदवारांनी अन्य उमेदवारांसोबत सामाजिक अंतर राखणे गरजेचे आहे.

.6 उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सांगितलेल्या सूचनेनुसार रांगेत उभे राहावे.

.7 उमेदवार जर लेखनीकाच्या सुविधेचा लाभ घेणार असेल तर लेखनीकाला सुद्धा स्वतःचा मास्क आणावा लागेल.

8. परीक्षा संपल्यावर उमेदवारांनी परीक्षा स्थळावरील स्टाफ द्वारा केलेल्या सूचनेनुसार गर्दी न करता व्यवस्थितरीत्या केंद्राबाहेर पडायचे आहे.

## आपणांस शुभेच्छा!